पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - १७२**

**<u>सभावृत्तांत</u>**

दिनांक – **०२/०६/२०१५** वेळ – **सकाळी ११.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक **०२/०६/२०१५** रोजी सकाळी **११.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१) मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे - सभापती**
२) मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
३) मा.गायकवाड संध्या सुरदास
४) मा.भालेकर शांताराम कोंडीबा ऊर्फ एस.के.बापु
५) मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
६) मा.तरस बाळासाहेब जयवंत
७) मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
८) मा.सौ.साळुंके सविता सुरेश
९) मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
१०) मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
११) मा.आल्हाट धनंजय मुरलीधर

याशिवाय मा.राजीव जाधव-आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक,मा.कांबळे-प्र.शहर अभियंता,मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना,मा.भोसले-मुख्यलेखापाल, मा.गावडे-सहआयुक्त, मा.पाटील, मा.तुपे–सहशहर अभियंता, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.कडूसकर, मा.गायकवाड, मा.खांडेकेकर, मा.दंडवते, मा.फुंदे, मा.दुरगुडे, मा.खोसे - सहा.आयुक्त, मा.डॉ.साळवे - अति.वैद्यकीय अधिकारी, मा.पवार-कायदा सल्लागार,मा.उबाळे-प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ), मा.पोमण-संगणक अधिकारी, मा.दुधेकर,मा.निकम,मा.इंगळे,मा.चव्हाण,मा.थोरात,मा.साळवी, मा.लडकत, मा.कुलकर्णी,मा.खाबडे,मा.दांगट,मा.बरशेट्टी,मा.जुंधारे,मा.गलबले,मा.घोडे, मा.केदारी, मा.कांबळे,मा.ओंभासे, मा.गट्टूवार,मा.शेख,मा.सोनवणे-कार्यकारी अभियंता,मा.इंदलकर-कामगार कल्याण अधिकारी, मा.बोदाडे-प्रशासन अधिकारी,मा.जरांडे - सुरक्षा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले -</u>**

विषय क्रमांक-४६) २०१५-१६ च्या अंदाजपत्रकामध्ये स्थापत्यविषयक विकास कामांच्या तरतुदीमध्ये वाढघट करण्यास मान्यता मिळणेबाबत-मा.संध्या गायकवाड, मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-४७) डॉ.पं.नंदकिशोर कपोते यांना कलापर्यवेक्षक/मानद सल्लागार या पदावर मुदतवाढ देणेबाबत- मा.संध्या गायकवाड, मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-४८) मनपाच्या आर्किटेक्ट पॅनेलवर नेमणेबाबत- मा.संध्या गायकवाड, मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-४९) सन २०१५-१६ चे अंदाजपत्रक तरतूद वर्ग करणेबाबत - मा.संध्या गायकवाड, मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-५०) प्रभागात वृक्षारोपणासाठी खड्डे खोदणे व पोयटा माती भरणेबाबत - मा.संध्या गायकवाड, मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-५१) सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पातील ड प्रभाग व ड मुख्यालयातील कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत - मा.संध्या गायकवाड, मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-५२) तरतुद वर्ग करणेबाबत- मा.संध्या गायकवाड, मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-५३) फ क्षेत्रीय कार्यालय मुख्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकामध्ये कामाच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत - मा.संध्या गायकवाड, मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-५४) म.न.पा.चे EWS प्रकल्प येथील ४०० सदनिका पत्रकार अधिवेशनास येणा-या पत्रकारांना दोन दिवस राहण्यासाठी देणेचे असलेने सदर ठिकाणी विजपुरवठा करणेबाबत...

विषय क्रमांक-५५) जेएनएनयुआरएम अंतर्गत प्रगतीपथावर असलेल्या औंध रावेत रस्त्यावरील काळेवाडी फाटा ते देहू आळंदी रस्ता ४५ मीटर रुंदीने विकसीत करणेबाबत...

विषय क्रमांक-५६) वॉर्ड क्र.५० थेरगाव गावठाण येथील जलनिस्सारण विषयक कामे करणे व उर्वरित ठिकाणी जलनिस्सारण नलिका टाकणेबाबत- मा.संध्या गायकवाड, मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-५७) तरतूद वर्गीकरण करणेबाबत - मा.संध्या गायकवाड, मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-५८) तालेरा रुग्णालयाचे विस्तारीकरणासाठी आवश्यक असलेला कर्मचारी वर्ग (स्टाफनर्स) एकत्रित मानधनावर हंगामी स्वरुपात ६ महिन्यांचे कालावधीकरीता भरणेबाबत...

विषय क्रमांक-५९) सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पातील ड प्रभाग व ड मुख्यालयातील कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत – मा.संध्या गायकवाड. मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-६०) वाढ/घट प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत – मा.सविता साळुंके, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव...

--------

दिनांक २६/०५/२०१५ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१७१) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

--------

ठराव क्रमांक – ११५७९ विषय क्रमांक – १

दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग – उद्यान

सुचक –मा.रमा ओव्हाळ अनुमोदक –मा.संध्या गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/६/कावि/२३३/२०१५ दि.१३/३/२०१५

विषय – आई उद्यान देखभाल व संरक्षण करणेकामी

विषय क्रमांक १चा विचार दिनांक ७/७/२०१५ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५८० विषय क्रमांक – २

दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग – उद्यान

सुचक –मा.संध्या गायकवाड अनुमोदक –मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/६/कावी/२३२/२०१५ दि.१३/३/२०१५

विषय – म.न.पा.चे हरीभाऊ दिनाजी वाघेरे उद्यान देखभाल कामाबाबत...

विषय क्रमांक २चा विचार दिनांक ७/७/२०१५ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११५८१ विषय क्रमांक – ३

दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक –मा.विनायक गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/३क/कावि/२३२/१४ दि.१५/३/२०१४

विषय – प्रभाग क्र.३१ दिघी व इत्यादी ठिकाणी अनधिकृत बांधकामावर हायराईज मशिनरीने कारवाई करणेबाबत...

विषय क्रमांक ३चा विचार दिनांक ७/७/२०१५ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११५८२ विषय क्रमांक – ४

दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/१अ/कावि/२५१/१४ दि.२०/५/२०१४

विषय – अ प्रभागातील अतिक्रमण कारवाईसाठी लागणा-या उंच इमारती पाडणेसाठी यंत्र सामग्री पुरविणेबाबत...

विषय क्रमांक ४चा विचार दिनांक ७/७/२०१५ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११५८३ विषय क्रमांक – ५

दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक –मा.रमा ओव्हाळ अनुमोदक –मा.संध्या गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/३क/कावि/४४/१५ दि.२०/२/२०१५

विषय – प्रभाग क्र.५८ इत्यादी ठिकाणी अनधिकृत बांधकामावर हायराइड मशिनरीने कारवाई करणेबाबत...

विषय क्रमांक ५चा विचार दिनांक ७/७/२०१५ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११५८४ विषय क्रमांक – ६
दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय
सुचक – मा.रमा ओव्हाळ अनुमोदक – मा.संध्या गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमुका/४/कावि/२६२/२०१५ दि.३०/३/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक शिक्षण विभागांतर्गत असलेल्या १८ माध्यमिक विद्यालये, क्रिडा प्रबोधिनी मुलांचे वसतीगृह व शिक्षण मंडळाकडील १३४ प्राथमिक शाळांची स्वच्छता करणेकामाची माध्यमिक शिक्षण विभागामार्फत ई-निविदा प्रसिध्द करुनपात्र निविदाधारकांची खाली नमुद केलेप्रमाणे नेमणुक करण्यात आली आहे.

| अ.क्र. | प्रभागाचे नाव(जुने) | नेमण्यात आलेल्या एजन्सीचे नाव | मा.स्थायी समिती ठराव क्रमांक व दिनांक | कामाचा मासिक दर/ खर्च र.रु. | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १ | अ | मे.बी.एस.ए.कार्पोरेशन लि. | ४२६४,दि.९/१०/२०१३ | ५,१५,०००/- | दि.१/१२/२०१३ ते दि.३०/११/२०१४ |
| २ | ब | मे.बी.एस.ए.कार्पोरेशन लि. | ४२६६,दि.९/१०/२०१३ | ४,४८,७१५/- | दि.१/१२/२०१३ ते दि.३०/११/२०१४ |
| ३ | क | मे.डी.एम.एंटरप्रायझेस | ४२६७,दि.९/१०/२०१३ | ५,१५,०००/- | दि.१/१२/२०१३ ते दि.३०/११/२०१४ |
| ४ | ड | मे.युनिक डेल्टा फोर्स सिक्युरिटी प्रा.लि. | ४३७८,दि.१७/१०/२०१३ | ४,६४,२५९/- | दि.१/१२/२०१३ ते दि.३०/११/२०१४ |

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे सदर ठेकेदारांची मुदत दि.३०/११/२०१४ रोजी संपतआहे. उपरोक्त मा.स्थायी समिती मंजूर ठरावानुसार सदरचे कामास पुढील १ वर्षाकरीता मुदतवाढ देता येईल अशी तरतुद आहे. त्यानुसार सदरचे ठेकेदारांचे कामास दिनांक ०१/१२/२०१४ पासून पुढील १ वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देणेस, याकामी त्यांचेशी करारनामा करणेस व किमान वेतन दरामध्ये शासनाकडून होणा-या वाढीनुसार येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी सदर ठेकेदाराचे काम समाधानकारक नसल्याने फेरनिविदा काढण्यात यावी व सदरचे ठेकेदारांस ऑगस्ट २०१५ अखेरपर्यंतच मुदतवाढ देण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहेत

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५८५ विषय क्रमांक – ७
दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग–मध्यवर्ती साहित्य भांडार (वैद्य)
सुचक –मा.संध्या गायकवाड अनुमोदक –मा.सुनिता गवळी
संदर्भ:- मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे जावक क्र.मसाभां/४/कावि/३४७/१५ दि.२९/४/२०१५
विषय - अपंग कल्याणकारी योजना क्र.३ अपंगांना चलन वलन साधने खरेदी करणेबाबत...

विषय क्रमांक ७चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५८६ विषय क्रमांक – ८
दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग–स्थापत्य
सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक –मा.विनायक गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/१अ/कावि/१०९/१५ दि.५/५/२०१५
विषय – प्र.क्र.१७ मध्ये अंतर्गत पाथवे पेव्हींग ब्लॉक पद्धतीने करणे (से.क्र.२६,२७,२७अ व २८)बाबत...

विषय क्रमांक ८चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५८७ विषय क्रमांक – ९
दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक –मा.रमा ओव्हाळ अनुमोदक –मा.संध्या गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/१अ/कावि/१०८/१५ दि.५/५/२०१५
विषय- प्राधिकरण प्र.क्र.१७ मधील से.क्र.२७ मधील पेव्हींग ब्लॉकची दुरुस्तीची व अनुषंगिक कामे करणेबाबत...

विषय क्रमांक ९चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५८८ विषय क्रमांक – १०
दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग –मध्यवर्ती साहित्य भांडार (वैद्य)
सुचक –मा.संध्या गायकवाड अनुमोदक –मा.सुनिता गवळी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मसाभां/४/कावि/३५६/१५ दि.६/५/२०१५
विषय – डिजीटल सोनोग्राफी मशिन खरेदीबाबत...

विषय क्रमांक १०चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५८९ विषय क्रमांक – ११
दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग – यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय
सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक –मा.विनायक गायकवाड
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/पीजी-३/कावि/४९०/२०१५ दि.१६/३/२०१५
विषय – मानसेवी पी.जी. टिचर्सच्या नेमणुकीबाबत...

विषय क्रमांक ११चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११५९० विषय क्रमांक – १२
दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग – सुरक्षा
सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.सुवि/३/कावि/५४८/२०१५ दि.१६/५/२०१५
विषय – ई-निविदा सुचना क्र.१/२०१४-२०१५ (१०० ट्रॅफिक वार्डन पुरविणे) बाबत...

विषय क्रमांक १२चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११५९१ विषय क्रमांक – १३

दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग – सुरक्षा

सुचक –मा.रमा ओव्हाळ अनुमोदक –मा.संध्या गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.सुवि/३/कावि/५४९/२०१५ दि.१६/५/२०१५

विषय – ई-निविदा सुचना क्र.२/२०१४-२०१५ (३७१ रखवालदार मदतनीस (अर्ध कुशल कामगार) पुरविणेबाबत...

विषय क्रमांक १३चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११५९२ विषय क्रमांक – १४

दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग – सुरक्षा

सुचक –मा.संध्या गायकवाड अनुमोदक –मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.सुवि/३/कावि/५५०/२०१५ दि.१६/५/२०१५

विषय – ई-निविदा सुचना क्र.३/२०१४-२०१५ (२९४ रखवालदार मदतनीस पुरविणे)बाबत...

विषय क्रमांक १४चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११५९३ विषय क्रमांक – १५

दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक –मा.विनायक गायकवाड

संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/लेखा/३इ/२४/२०१५ दि.२२/५/२०१५

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.इ मुख्यालय/ HO/३१/९/२०१४-१५ अन्वये, वॉर्ड क्र.३५ धावडेवस्ती येथे कोंडीबा लांडगे मार्ग व बोल्हु लांडगे मार्ग येथे नविन पेव्हिंग ब्लॉक बसविणेकामी मे.देव कंन्स्ट्रक्शन (नि.र.रु.७,०७,२८०/- (अक्षरी र.रू. सात लाख सात हजार दोनशे ऐंशी) पेक्षा ३७.०० % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.**४,६७,८६६/-** पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११५९४ विषय क्रमांक – १६
दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग – नागरवस्ती विकास योजना
सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ
संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.नावियो/५/कावि/१३१/२०१५ दि.२१/५/२०१५

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.महापालिका सभा ठराव क्र. ९४४ दिनांक २३/७/२०१० व महापालिका सभा ठराव क्र.९७ दि.१/९/२०१२ अन्वये मंजूर धोरणानुसार निःसमर्थ (अपंग) कल्याणकारी योजना क्र.७ मनपा क्षेत्रातील ० वर्षापुढील मतिमंद व्यक्तीचा सांभाळ करणा-या मनपा हद्दीतील नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थेस अथवा पालकांना अर्थसहाय्य दरमहा रक्कम रूपये १,०००/- देण्याची तरतुद आहे. तसेच मा.महापालिका सभा ठराव क्र. ४५४ दिनांक २०/१/२०१४ अन्वये मूळ योजनेमध्ये दुरूस्ती करून वय वर्षे ० पेक्षा अधिक वय असणा-या मतिमंद मुले/व्यक्ती यांचा सांभाळ करणा-या स्वयंसेवी संस्था/पालक यांना दरमहा र.रू.२,०००/- अर्थसहाय्य अदा करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामधील माहे ऑगस्ट २०१४ अखेर एकुण १६७ पात्र लाभार्थीना अर्थसहाय्य अदा करणे आवश्यक आहे. सन २०१४-१५ मधील सहामाही माहे ऑक्टोबर २०१४ ते माहे मार्च २०१५ या कालावधि करिता प्रत्येकी र.रू.१२,०००/- प्रमाणे रक्कम रूपये २०,०४,०००/- (अक्षरी रक्कम रूपये वीस लाख चार हजार फक्त) खर्च अपेक्षीत आहे. सन २०१५-१६ चा वित्तीय वर्षात "५ वर्षापुढील मतिमंद मुल/व्यक्तीचा सांभाळ करणा-यास अर्थसहाय्य" या उपलेखाशिर्षावर र.रू.३,९६,००,०००/- इतकी तरतूद करणेत आली असुन त्यामधून सदरचा खर्च करणेत येईल. तरी सन २०१४-१५ मधे अर्ज सादर केलेल्या १६७ पात्र लाभार्थीना सन २०१४-१५ या आर्थिक वर्षातील सहामाही माहे ऑक्टोबर २०१४ ते माहे मार्च २०१५ या कालावधी करिता प्रत्येकी र.रू.१२,०००/-प्रमाणे रक्कम रूपये २०,०४,०००/- (अक्षरी रक्कम रूपये वीस लाख चार हजार फक्त) खर्चास तसेच सन २०१५-१६ मध्ये नव्याने अर्ज प्राप्त होणारे पात्र लाभार्थीना दरमहा र.रू.२,०००/- प्रमाणे माहे एप्रिल २०१५ ते माहे मार्च २०१६ या कालावधीकरिता प्रत्येकी वार्षीक र.रू.२४,०००/-प्रमाणे अर्थसहाय्य अदा करणेकामी येणा-या एकुण प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११५९५ विषय क्रमांक – १७
दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक –मा.रमा ओव्हाळ अनुमोदक –मा.संध्या गायकवाड
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/लेखा/३इ/२३/२०१५ दि.२५/५/२०१५

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.इ मुख्यालय/ HO/३१/१/२०१४-१५ अन्वये, भोसरी येथील सर्व व्यायाम शाळांची स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.देव कंन्स्ट्रक्शन (नि.र.रु.७,०७,२८०/- (अक्षरी र.रू.सात लाख सात हजार दोनशे ऐंशी) पेक्षा ३७.०० % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.४,६७,८६६/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११५९६ विषय क्रमांक – १८
दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग – ड क्षेत्रिय कार्यालय
सुचक –मा.संध्या गायकवाड अनुमोदक –मा.सुनिता गवळी
संदर्भ:- मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे जावक क्र.डक्षे/३/कावि/२०८/२०१५ दि.२५/५/२०१५

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या ड क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.५/१-२०१४-१५ अन्वये ड प्रभाग अंतर्गत वाकड-पिंपरी विभागांतर्गत विविध कार्यक्रमांकरीता तात्पुरत्या स्वरुपाची ध्वनीक्षेपण व प्रकाश व्यवस्था करणेकामी मे.मोरया मंडप डेकोरेटर्स (नि.र.रु.९,३३,७०७/- (अक्षरी र.रु.नऊ लाख तेहतीस हजार सातशे सात फक्त) पेक्षा १.७० % कमी) या ठेकेदारांकडून निविदा मंजूर दराने र.रु.९,१७,८३४/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कलावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११५९७ विषय क्रमांक – १९
दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग – ड क्षेत्रिय कार्यालय
सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक –मा.विनायक गायकवाड
संदर्भ:- मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे जावक क्र.डक्षे/३/कावि/२०९/२०१५ दि.२५/५/२०१५
विषय - प्रभाग क्र.४३ ते ४८, ५४ ते ५७ मधील स्ट्रॉर्म वॉटर चैंबर्स साफसफाई करुन गाळाची वाहतुक करणेबाबत...

विषय क्रमांक १९चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११५९८ विषय क्रमांक – २०
दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ
संदर्भ:- मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/वा.क/कावि/२६/२०१५ दि.२५/५/२०१५

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.वाहतूक/ HO/२८/३/२०१३-१४ अन्वये, पिंपरी चिंचवड मनपा हददीतील दिशादर्शक स्थलदर्शक, पार्किंग, नो पार्किंग बोर्ड व इतर वाहतूक विषयक साहित्य पुरविणे व बसविणेकामी मे.भालेराव कंन्स्ट्रक्शन (नि.र.रु.२०,९९,९०५/- (अक्षरी र.रू.वीस लाख नव्यान्नव हजार नऊशे पाच) **पे**क्षा २१.२१% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१७,३७,२४१**/-** पर्यंत काम करून घेणेस व त्याचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११५९९ विषय क्रमांक – २१
दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक –मा.रमा ओव्हाळ अनुमोदक –मा.संध्या गायकवाड
संदर्भ:- मा.सहआयुक्त यांचे जावक क्र.मभां/५/कावि/५०९/२०१५ दि.२२/५/२०१५

मा.सहआयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे मा.प्रभाग अध्यक्ष व नागरी सुविधा केंद्र यांचे कार्यालयीन कामकाजासाठी मोबाईल संच खरेदीकामी को.नो.क्र.५/२०१५-१६ अन्वये लघुत्तम कोटेशनधारक मे.धर्मे एंटरप्रायजेस यांना आवश्यक मोबाईल संच खरेदीकामी एकत्रित एकूण र.रु.१,३४,५५०/- दर स्विकृत करणेत आले असून त्यांचे बरोबर करारनामा करणेत आलेला आहे. प्रस्तूतकामी केलेल्या संविदेची माहिती अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११६०० विषय क्रमांक – २२
दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक –मा.संध्या गायकवाड अनुमोदक –मा.सुनिता गवळी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/८/कावि/४२६/२०१५ दि.२६/५/२०१५
विषय - मनपाचे गणवेश देय कर्मचा-यांना बुट, चप्पल (पादत्राणे) खरेदीबाबत...

विषय क्रमांक २२चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११६०१ विषय क्रमांक – २३
दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक –मा.विनायक गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/३/कावि/३१/२०१५ दि.२६/५/२०१५
विषय - वॉर्ड क्र.१२ च-होली येथील काळजेवाडी येथे शाळा इमारतीचा विस्तार करणे व सिमाभिंत बांधणेबाबत...

विषय क्रमांक २३चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११६०२ विषय क्रमांक – २४
दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/३/कावि/३०/२०१५ दि.२६/५/२०१५
विषय - प्र.क्र.७ च-होली मधील स.नं.९७२ ते ९३८ पर्यंतचा १८ मी डी.पी. रस्ता विकसीत करणेबाबत...

विषय क्रमांक २४चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११६०३ विषय क्रमांक – २५
दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक –मा.रमा ओव्हाळ अनुमोदक –मा.संध्या गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/लेखा/३इ/कावि/२९/२०१५ दि.१५/४/२०१५
विषय – प्र.क्र.७ च-होली दर्गा ते पठारेमळा २४ मी. रस्त्यावर कलवर्ट बांधणेबाबत...

विषय क्रमांक २५चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११६०४ विषय क्रमांक – २६
दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग – स्थापत्य, इ क्षेत्रीय कार्यालय
सुचक –मा.संध्या गायकवाड अनुमोदक –मा.सुनिता गवळी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/इक्षेका/कावि/६५६/२०१५ दि.२१/५/२०१५
विषय-भोसरी स.नं.१ येथील आरक्षण क्र.४३१ मध्ये शंभर बेडचे अद्यावत रुग्णालय व वाचनालय बांधणेचे कामाकरीता मे.शशी प्रभू अँड असो. यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (पीएमसी) म्हणुन नेमणुक करणे व फी अदायगीबाबत...

विषय क्रमांक २६चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११६०५ विषय क्रमांक – २७
दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक –मा.विनायक गायकवाड
संदर्भ:- मा.सहआयुक्त यांचे जावक क्र.मभां/०४/कावि/४३६/२०१५ दि.२६/५/२०१५

मा.सहआयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे क्रीडा विभागासाठी आवश्यक छपाई साहित्य खरेदीबाबत कोटेशन नो.क्र. ५३/२०१४-१५ अन्वये बंद पाकीटात दरपत्रक मागविणेत आले होते. त्यानुसार कोटेशन नो.क्र.५३/२०१४-१५ एकुण ०३ कोटेशन नोटीस दरपत्रक प्राप्त झालेले आहेत. प्राप्त दरपत्रकातील लघुत्तम कोटेशनधारक मे.अमृत मुद्रणालय, चिंचवड यांचे छपाईकामी एकुण र.रु.८३,०००/- (अक्षरी र.रू.त्र्याऐंशी हजार) चे दर स्विकृत करणेत आले असुन त्यांचेबरोबर करारनामा करणेत आलेला आहे. प्रस्तुतकामी केलेल्या संविदेची माहिती अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११६०६ विषय क्रमांक – २८
दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/०४/कावि/४३७/२०१५ दि.२६/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे विविध विभागास आवश्यक अभिलेखाचे रेकॉर्ड बांधण्याचे कापडी रुमाल खरेदी करणेकामी महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक भांखस/हातमाग कापड/दर निश्चिती/१३/२०१४-१५/सी-१७७२१ दिनांक २१/०८/२०१४ अन्वये महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्यादित, मुंबई

यांचेकडुन अभिलेखाचे रेकॉर्ड बांधण्याचे कापडी रुमाल विविध रंगात ३६ * ३६ इंच साईजमध्ये शिलाई करुन रुमाल तयार करणे व त्यास नाडी लावणे व रुमालाचे समप्रमाणत मनपा बोधचिन्ह छपाईसह २०,००० नग खरेदी कामी र.रु.१५,५६,०००/- (अक्षरी र.रु.पंधरा लाख छप्पन हजार फक्त) चे खर्चास दर करार नुसार करारनामा न करता थेट पध्दतीने येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११६०७ विषय क्रमांक – २९

दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग – ई-गव्हर्नन्स

सुचक –मा.रमा ओव्हाळ अनुमोदक –मा.संध्या गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.ई-ग/९/कावि/२४०/२०१५ दि.२७/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत नागरीकांना विविध प्रकारच्या सेवा ऑनलाईन पध्दतीने उपल्बध करुन देण्यात येत आहेत त्यासाठी आवश्यक संगणक प्रणाली विकसीत करण्यात आलेली असुन त्यामधे विविध खेळांचे ऑनलाईन बुकिंग, नागरवस्ती विकांस योजनांची माहिती, प्रॉपर्टी टॅक्स, पाणिपट्टी भरणा, एल.बी.टी, हॉस्पीटल, बांधकाम परवानगी, तक्रार निवारण, झोन दाखला, भाग नकाशा, जन्म मृत्यु दाखला, विवाह नोंदणी, माहीतीचा अधिकार इ. सेवा संगणकीकृत पध्दतीने ऑनलाइन उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. सदरच्या सेवांसाठी नागरीकांनी अर्ज केल्यानंतर त्यांच्या अर्जाची सद्यस्थिती, पुर्तता इ बाबतची माहीती त्यांना कार्यालयात न येता त्यांच्या मोबाइलवर एसएमएसच्या स्वरुपात उपलब्ध करण्यात येते त्याकरीता एसएमएस उपलब्ध करण्याचे गरजेचे असल्याने निविदा सुचना क्र. १३/२०१४-१५ प्रसीध्द करण्यात आलेली होती. सदर निविदेसाठी एकुण तिन निविदा प्राप्त झालेल्या असुन त्यामध्ये (1) Dezire Graphics (2) Tech 9 Services (3) Dimakh Consultants यांच्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत. यापैकी सदर कामकाजासाठी M/s. Dezire Graphics यांचे दर सर्वात लघुत्तम प्राप्त झालेले आहेत. उपरोक्त कामकाजासाठी प्राप्त झालेल्या दरांचा विचार करता सदरचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.७४ % कमी प्राप्त झाले होते. सदरचे दर आणखी कमी करणे शक्य आहे किंवा कसे याबाबत संबंधीतांना विचारणा केली असता मे.डीझायर ग्राफीक्स यांनी र.रु.२७,०००/- कमी करुन दिले आहेत आणि एकुण र.रु.१६,२९,०००/- ला काम करण्यास तयार असल्याचे कळविले आहे. सदरचे दर दि.०७.०४.२०१५ चे प्रस्तावान्वये स्विकृत करणेत आलेले असुन होणा-या खर्चाचे व केलेला करारनामा अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११६०८ विषय क्रमांक – ३०

दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय

सुचक –मा.संध्या गायकवाड अनुमोदक –मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आ.मु.का./४/कावि/४९७/२०१५ दि.२६/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत ई-निविदा नोटीस क्र.१/२०१४-१५ प्रसिध्द करुन पिंपरी चिंचवड महानगरपालिका मालकीचे (१) वाय.सी.एम.एच., (२) तालेरा, (३) भोसरी, (४) जिजामाता, (५) आकुर्डी, (६) थेरगाव, (७) सांगवी, (८) यमुनानगर रुग्णालये व त्या भोवतालच्या परीसरात डास, माशा, ढेकुण, झुरळ, उंदीर / घुशी इत्यादीचा उपद्रव होऊ नये म्हणून त्यावर नियंत्रण आणणेकामी शास्त्रोक्त पध्दतीने औषध फवारणी (पेस्ट कंन्ट्रोल) करणे या कामासाठी १ वर्ष

कालावधीसाठी निविदा मागविण्यात आल्या आहेत. सदर कामासाठी प्राप्त निविदाधारकांपैकी पात्र ठरलेल्या भिमाशंकर एंटरप्रायजेस यांनी अंदाजपत्रकीय वार्षिक र.रु.९,७०,०००/- पेक्षा (४० % कमी) र.रु.५,८२,०००/- सादर केलेला दर मान्य असलेने र.रु.५,८२,०००/- (अक्षरी र.रू.पाच लाख ब्याऐंशी हजार) च्या वार्षिक खर्चास, तसेच संबंधिताबरोबर १ वर्षाचा करारनामा करुन कामाचा आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११६०९ विषय क्रमांक – ३१

दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय

सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक –मा.विनायक गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आ.मु.का./४/कावि/४९८/२०१५ दि.२६/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत ई-निविदा नोटीस क्र.२/२०१४-१५ प्रसिध्द करुन पिंपरी चिंचवड महानगरपालिका मुख्य इमारत, स्थानिक संस्था कराचे सर्व कोठार, हेगडेवार भवन व ६ क्षेत्रीय कार्यालयांमध्ये पेस्ट कंन्ट्रोल करणे या कामासाठी १ वर्ष कालावधीसाठी निविदा मागविण्यात आल्या आहेत. सदर कामासाठी प्राप्त निविदाधारकांपैकी पात्र ठरलेल्या भिमाशंकर एंटरप्रायजेस यांनी अंदाजपत्रकीय वार्षिक र.रु.९,३०,०००/- पेक्षा (४० % कमी) र.रु.५,५८,०००/- सादर केलेला दर मान्य असलेने र.रु.५,५८,०००/-(अक्षरी र.रू.पाच लाख अठ्ठावन्न हजार)च्या वार्षिक खर्चास, तसेच संबंधिताबरोबर १ वर्षाचा करारनामा करुन कामाचा आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११६१० विषय क्रमांक – ३२

दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/१अ/कावि/१२०/२०१५ दि.२२/५/२०१५

विषय - प्राधिकरण प्र.क्र.१७ मधील संभाजी चौक ते हुतात्मा चौका पर्यंतच्या रस्त्यास IRS प्रमाणे फुटपाथ तयार करणे व अनुषंगिक कामे करणेबाबत...

विषय क्रमांक ३२चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११६११ विषय क्रमांक – ३३

दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक –मा.रमा ओव्हाळ अनुमोदक –मा.संध्या गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/१अ/कावि/११९/२०१५ दि.२२/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.४४/२०१४-१५ मधील अ.क्र.१७ अन्वये, प्राधिकरण प्र.क्र.१७ मधील आकुर्डी रेल्वे स्टेशन परिसरातील नुतनीकरणाचे कामे करणेकामी मे.अजवानी इंफ्रा.प्रा.ली. (नि.र.रु.४६,२१,७१८/- (अक्षरी र.रू.शेहेचाळीस लाख एकवीस हजार सातशे अठरा) पेक्षा २८.९९ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.३४,४५,९७६/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारित

केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकाराक राहील. या अटीस अधीन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११६१२ विषय क्रमांक – ३४

दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक –मा.संध्या गायकवाड अनुमोदक –मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/१अ/कावि/११८/२०१५ दि.२२/५/२०१५

विषय - प्राधिकरण प्र.क्र.१७ मधील से.क्र.२८ मधिल पेव्हींग ब्लॉकची दुरुस्तीची व अनुषंगिक कामे करणेबाबत...

विषय क्रमांक ३४चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११६१३ विषय क्रमांक – ३५

दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक –मा.विनायक गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/१अ/कावि/११३/२०१५ दि.११/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.स्थापत्य/अ मुख्यालय/HO/४४/३/२०१४-१५ अन्वये, प्र.क्र.१४ मध्ये डांबरी रस्त्यांचे व अकस्मित व तातडीची दुरुस्तीची कामे करणेकामी M/S. AJWANI INFRASTRUCTURE PVT LTD (नि.र.रु.४६,६८,५३४/- (अक्षरी र.रू.शेहेचाळीस लाख अड्सष्ट हजार पाचशे चौतीस) पेक्षा -२७.९९% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.३५,२९,९०२/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकाराक राहील. या अटीस अधीन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११६१४ विषय क्रमांक – ३६

दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/१अ/कावि/११४/२०१५ दि.११/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.स्थापत्य/अ मुख्यालय/HO/४४/१५/२०१४-१५ अन्वये, प्राधिकरण प्र.क्र.१७ मधील रस्त्याचे सुशोभिरणाची कामे करणेकामी M/S. AJWANI INFRASTRUCTURE PVT LTD (नि.र.रु.४१,९५,२९१/- (अक्षरी र.रू. एक्केचाळीस लाख पंच्यान्नव हजार दोनशे एक्यान्नव) पेक्षा -२७.९९ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.३१,७२,०८१/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली

वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकाराक राहील. या अटीस अधीन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११६१५ | विषय क्रमांक – ३७

दिनांक – ०२/०६/२०१५ | विभाग – स्थापत्य

सुचक –मा.रमा ओव्हाळ | अनुमोदक –मा.संध्या गायकवाड

संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/१अ/कावि/११५/२०१५ दि.११/५/२०१५

विषय - प्र.क्र.१९ वाल्हेकरवाडी येथे गतिरोधक करणे, झेब्रापट्टे रंगविणे व इतर स्थापत्य विषयक कामे कामे करणेबाबत...

विषय क्रमांक ३७चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११६१६ | विषय क्रमांक – ३८

दिनांक – ०२/०६/२०१५ | विभाग – माध्यमिक शिक्षण

सुचक –मा.संध्या गायकवाड | अनुमोदक –मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माध्य/शि/३/कावि/८२/२०१५ दि.२८/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील खाजगी मान्यताप्राप्त व मनपाचे सर्व ५ वी ते १० वी विद्यार्थी / विद्यार्थीनीस मोफत बसपास योजना सन २००९-१० पासून लागू करणेत आली आहे. मागील वर्षी सन २०१४-१५ मध्ये एकुण २०,९३३ विदयार्थ्यांना मोफत बसपास देणेत आलेले असून त्याकामी र.रु.८,६०,४९,९९६/- इतका खर्च आलेला आहे. तरी पुणे महानगरपालिकेत अशाच प्रकारची योजना राबविली जात असलेने सन २०१५-१६ पासून सदरची योजना बंद करुन त्या ऐवजी नवीन सुधारित बसपास योजना लागु करणेस मा.महापालिका सभेची मंजुरी घेणेत आली आहे. सदर योजने अंतर्गत मनपा शाळेतील विदयार्थ्यांना संपुर्ण शैक्षणीक वर्षातील कालावधीसाठी मोफत बसपास दिला जाणार असून इतर खाजगी विदयालयांमधील विदयार्थ्यांना एकुण बसपासच्या रकमे पैकी २५ टक्के रक्कम ही विदयार्थ्याकडून वसूल केली जाणार आहे. तरी सदर योजनेच्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड मनपा मध्ये देखिल सदरची योजना राबविली असता मनपाला अर्थिक बोजा सहन करावा लागणार नाही तसेच पासधारकांची निश्चीत संख्या ही मनपाला प्राप्त होईल जेणे करून दुबार पास, बोगस नावे इ. प्रकारच्या घटना भविष्यात उदभवनार नाही. तरी पुणे महानगरपालिकेच्या धर्तीवर मोफत बसपास ची सुधारीत योजना राबवावी असे मत आहे. पीएमपीएमएल यांनी पत्र क्र.पीएमपीएमएल/टी.एम/६३९ दि.०८/०५/२०१५ अन्वये इ.५ वी ते १० वीच्या विदयार्थ्यांना पुणे मनपाच्या धर्तीवर धोरण निश्चीत करुन सदरची योजना राबविणे बाबत त्वरीत आदेश मिळणे बाबत कळविले आहे. तरी सदरची योजना राबविणे हा मनपाचा धोरणात्मक निणर्य असलेने त्यास खाली नमूद केलेल्या बाबींवर मा.महापालिका सभेची मंजूरी घेणे आवश्यक आहे. (४) यापुर्वी असलेली मोफत बसपास योजना बंद करणेस, (५) सुधारित योजने अंतर्गत मनपा विदयालयातील विदयार्थांना संपुर्ण कालावधीसाठी मोफत बसपास देणेस, (६) मनपा हददीतील खाजगी विदयालयांमधील विदयार्थ्यांकडून एकुण बसपासच्या रकमेपैकी २५ % रक्कम चलनाने मनपा कोषागारात भरुन सदरचे चलन अर्जासोबत पीएमपीएमएलकडे सादर करुन पास घेणे व पीएमपीएमएलने वितरित केलेल्या पासेसच्या रकमेचे बील मनपाकडे सादर करणे व सादर

केलेल्या बिलापोटी रक्कम अदा करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११६१७ विषय क्रमांक – ३९

दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग – यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय

सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक –मा.विनायक गायकवाड

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/पीजी१/कावि/४४४/२०१५ दि.२७/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयाकरिता आवश्यक असलेली प्रस्तावातील प्रपत्र 'अ' मध्ये नमूद केलेली विविध पदे ही एकत्रित मानधनावर ६ महिन्याकरिता तात्पुरत्या स्वरूपात एकत्रित मानधनावर भरणेस, तसेच सदर पदे वृत्तपत्रात जाहिरात देऊन Walk In Interview ने भरणेस आणि सदर पदांना प्रस्तावातील प्रपत्र 'ब' मध्ये नमूद केलेल्या अनुभवाप्रमाणे दरमहा एकत्रित मानधन रक्कम अदा करणेस आणि प्रस्तावातील प्रपत्र 'अ' मधील १ ते १७ करीता उमेदवार न मिळालेस सदर पदे भरेपर्यंत दर सोमवारी Walk In Interview ने भरणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११६१८ विषय क्रमांक – ४०

दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग – यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय

सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/पीजी१/कावि/४४३/२०१५ दि.२७/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालयातील कामाचा व्याप पाहता मागील ६ महिन्यात मानधनावर जे कर्मचारी नेमलेले आहेत. त्यांची मुदत दि.०७/०६/२०१५ रोजी संपुष्टात येत असल्याने प्रस्तावा सोबतचे प्रपत्र 'अ' मध्ये नमुद केलेल्या पदांसाठी दर्शविलेप्रमाणे नियुक्त केलेले मानधनावरील कर्मचारी यांना विशेष बाब म्हणून दि.०८/०६/२०१५ रोजी १ दिवस सेवा खंडीत करुन दि.०९/०६/२०१५ पासुन दि.०७/०९/२०१५ पर्यंत पुढे २ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देणेकामी व सदर कालावधीमध्ये ती १२५ पदे पुर्ण क्षमतेने भरेपर्यंत Walk In Interview ने भरणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११६१९ विषय क्रमांक – ४१

दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग – यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय

सुचक –मा.रमा ओव्हाळ अनुमोदक –मा.संध्या गायकवाड

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/पीजी१/कावि/४४५/२०१५ दि.२७/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयाकरिता आवश्यक असलेली प्रस्तावातील प्रपत्र 'अ' मध्ये नमूद केलेले पद हे एकत्रित मानधनावर ६ महिन्याकरिता तात्पुरत्या स्वरूपात एकत्रित मानधनावर भरावी लागणार आहेत. आणि सदर पदाला प्रस्तावातील प्रपत्र 'ब' मध्ये नमूद केलेल्या अनुभवाप्रमाणे दरमहा एकत्रित मानधन रक्कम अदा करणेस यापुर्वी मान्यता मिळालेली आहे. यशवंतराव चव्हाण

स्मृति रुग्णालयामधील एकत्रीत मानधनावर भरण्यात येणारी स्टाफनर्स या पदांची परीक्षा यापुढे प्रशासन विभागाने घ्यावी असे मा.आयुक्त सो. यांनी दि.०७/०८/२०१४ रोजी शेरांकन केलेले आहे. त्याप्रमाणे १) त्यानुसार प्रशासन विभागाकडुन सदर पदाची परीक्षा घेवुन निवड यादी तयार करून मिळणेस मान्यता तसेच २) वायसीएम रूग्णालय व इतर ठिकाणी आवश्यक असणा-या १४० स्टाफनर्स जाहीरात देवुन भरणेस मान्यता ३) जाहीरातीद्वारे पुर्ण क्षमतेने सदर पदाला उमेदवार न मिळाल्यास त्यासाठी पुढील ६ महिन्यात दर सोमवारी Walk in interview ने पदे भरणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११६२० विषय क्रमांक – ४२

दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक –मा.संध्या गायकवाड अनुमोदक –मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.सहआयुक्त यांचे जावक क्र.मभां/५/कावि/५२२/२०१५ दि.२७/५/२०१५

मा.सहआयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागांसाठी झेरॉक्स मशीनचे टोनर साहित्य पुरवठा करणेकामी को.नो.क्र.०४/२०१५-१६ अन्वये मनपा वेबसाईटवर कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन सिलबंद लिफाप्यात कोटेशन दर मागविण्यात आले होते. त्यानुसार सिलबंद लिफाप्यात तीन दरपत्रके प्राप्त झाली आहेत. प्राप्त दरपत्रकामध्ये मे.एस.बी. इलेक्ट्रॉनिक्स, पुणे. यांचे आवश्यक टोनर साहित्य बाब क्र.१ ते ०२ (एकूण ४० नग) साहित्याचे र.रु.१,६८,०००/- लघुत्तमदर प्राप्त झाले आहेत. सदरचा खर्च हा अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा ४.३० % ने कमी आहे. मे.एस.बी. इलेक्ट्रॉनिक्स यांचे आवश्यक टोनर साहित्य खरेदी करणेकामी एकुण र.रु.१,६८,०००/- दर स्विकृत करण्यास मा.सह आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. प्रस्तूतकामी केलेल्या संविदेची माहिती अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११६२१ विषय क्रमांक – ४३

दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक –मा.विनायक गायकवाड

संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/३/कावि/३७/२०१५ दि.२८/५/२०१५

विषय - प्र.क्र.२९ मधील इमारतींची स्थापत्य विषयक दुरूस्ती करणेबाबत...

विषय क्रमांक ४३चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११६२२ विषय क्रमांक – ४४

दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भ:- मा.सहआयुक्त यांचे जावक क्र.मभां/५/कावि/५२५/२०१५ दि.२७/५/२०१५

मा.सहआयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे मुलेप विभागात पिण्याचे पाण्याचे सोयीच्या दृष्टीकोनातून Aqua Water Purifier साहित्य खरेदीकामी कोटेशन नोटीस क्र.०६/२०१५-१६ अन्वये, मनपा वेबसाईटवर कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन सिलबंद लिफाप्यात कोटेशन दर मागविण्यात आले होते. त्यानुसार सिलबंद लिफाप्यात

तीन दरपत्रके प्राप्त झाली आहेत. प्राप्त दरपत्रकामध्ये मे.टेक्नो अँड आयएनसी, पिंपरी. यांचे आवश्यक वॉटर प्युरिफायर बाब क्र.१ साहित्याचे र.रु.८,६००/- लघुत्तम दर प्राप्त झाले आहेत. सदरचा खर्च हा अंदाजपत्रकीय रक्कमे पेक्षा ७.६७ % ने कमी आहे. मे.टेक्नो अँड आयएनसी यांचेकडून आवश्यक वॉटर प्युरिफायर साहित्य खरेदी करणेकामी एकूण र.रु.८,६००/- दर स्विकृत करण्यास मा.सह आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. प्रस्तूतकामी केलेल्या संविदेची माहिती अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११६२३ विषय क्रमांक – ४५

दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग – प्रशासन

सुचक –मा.रमा ओव्हाळ अनुमोदक –मा.संध्या गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/३/कावि/५५५/२०१५ दि.२८/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

भरतीसाठी घेण्यात आलेल्या लेखी परीक्षेच्या बैठक व्यवस्थेसाठी सेवाशुल्क अदा करणेकामी २०,६८८ उमेदवारांकरिता ४८ खाजगी शाळा/ महाविद्यालये व शैक्षणिक संस्थाचे इमारतींमध्ये, कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक व सर्व्हेअर पदाच्या लेखी परीक्षेसाठी केलेल्या बैठक व्यवस्थेपोटी उमेदवारांचे संख्ये नुसार प्रति उमेदवार र.रु.५/- याप्रमाणे सेवाशुल्क (सर्व करासह) अदा करणेस व त्यापोटी येणा-या एकूण र.रु.१,०३,४४०/- (अक्षरी र.रू.एक लाख तीन हजार चारशे चाळीस) इतक्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

**<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले –</u>**

ठराव क्रमांक – ११६२४ विषय क्रमांक – ४६

दिनांक – ०२/०६/२०१५

सुचक –मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.संध्या गायकवाड, मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

क प्रभागातील अंदाजपत्रकामधील प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे विकास कामांमध्ये वाढ व घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.३,५०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११६२५ विषय क्रमांक – ४७

दिनांक – ०२/०६/२०१५

सुचक –मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.संध्या गायकवाड, मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

माध्यमिक शिक्षण विभागाचे अंतर्गत कार्यरत संगीत अकादमी विभागात कलापर्यवेक्षक/मानद सल्लागार या पदावर डॉ.पं.नंदकिशोर कपोते यांची प्रस्तावात नमूद संदर्भिय आदेशान्वये नेमणूक करणेत आली असून दिनांक ११/६/२०१५ रोजी त्यांची मुदत संपलेली आहे. डॉ.पं.नंदकिशोर कपोते हे आंतरराष्ट्रीय किर्तीचे कथ्थक नर्तक असून त्यांना महाराष्ट्र शासनाचा सांस्कृतिक पुरस्कार सन २००३ व महाराष्ट्र शासनाचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्कार सन २०१० मध्ये प्राप्त झाले आहेत. तसेच त्यांना नुकताच पुणे महानगरपालिकेचा बालगंधर्व पुरस्कार प्राप्त झाला आहे. तसेच संपुर्ण भारतात

नृत्यात पी.एच.डी. करणारे पदमविभूषण पं.बिरजू महाराजांचे एकमेव शिष्य आहेत. पिंपरी चिंचवड संगीत अकादमीत त्यांचे मौलीक मार्गदर्शन मिळते ही बाब गौरवास्पद आहे. त्यांनी विविध सांगीतीक उपक्रम सुरु केले आहेत. उदा. दिवाळी पहाट, वासंतिक संगीत शिबीर, वर्धापनदिन दिन, मासिक संगीत सभा, नामवंत कलाकारांची शिबीरे इ. कार्यक्रमांना चांगली प्रसिद्धी मिळाली आहे. तरी संगीत अकादमीस कलापर्यवेक्षक/मानद सल्लागार या पदासाठी डॉ.पं.नंदकिशोर कपोते यांची पुढिल सहा महिने कालावधीसाठी दरमहा एकत्रित मानधन र.रु.२५,०००/- वर नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११६२६ विषय क्रमांक – ४८

दिनांक – ०२/०६/२०१५

सुचक –मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.संध्या गायकवाड, मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

A & T कन्सल्टंट, एफ.सी. रोड, पुणे – ४११००५ यांस मनपाच्या आर्किटेक्ट पॅनेलवर नेमून त्यांस मनपाची आर्किटेक्ट विषयक कामे देण्यास व त्याकामी होणारी आर्किटेक्ट फी, आर्किटेक्ट कौन्सिलच्या नियमानुसार वेळोवेळी देण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११६२७ विषय क्रमांक – ४९

दिनांक – ०२/०६/२०१५

सुचक –मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.संध्या गायकवाड, मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

महानगरपालिकेच्या सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकामधील प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे तरतूद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.६,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११६२८ विषय क्रमांक – ५०

दिनांक – ०२/०६/२०१५

सुचक –मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.संध्या गायकवाड, मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

नोटिस क्र.१ बाब क्र.१ व ६/२०१४-१५ अन्वये मे.समीर एन्टरप्रायजेस यांना स्थायी समिती ठराव क्र. ८३६६ दिनांक १६.०९.२०१४ अन्वये मनपाचे उद्यान विभागाकडील नोटिस क्र.१ बाब क्र.१ व ६/२०१४-१५ मधील प्रभागात वृक्षारोपणासाठी खड्डे खोदणे व पोयटा माती भरणे मे.समीर एन्टरप्रायजेस (निविदा रक्कम रु. ९,३३,४१०/-) अक्षरी र.रु.नऊ लाख तेहतीस हजार चारशे दहा फक्त) पेक्षा ३४.००% कमी या ठेकेदाराची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३४.००% सर्वात कमी दराची निविदा स्विकृत करणेत आली असून प्रभाग समिती ठराव क्र.१६ दि. १५.५.२०१४ अन्वये येणारे अंदाजे र.रु.९,९९.७००/- चे खर्चाचे पुर्वगणनपत्रकास सुधारित प्रशासकीय मान्यता आहे. कामाचे अंदाजे र.रु.९,९९,७००/- (अक्षरी रक्कम रु. नऊ लाख नव्याण्णव हजार सातशे फक्त) चे सुधारित खर्चास (वाढिव रक्कम रु. ६६,२९०/- अक्षरी सहासष्ट हजार दोनशे नव्वद फक्त) चे वाढीव खर्चास मान्यता देणेत येत आहे. व सदरचे काम संपूर्ण अ प्रभाग कार्यक्षेत्रासाठी करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ११६२९ विषय क्रमांक – ५१

दिनांक – ०२/०६/२०१५

सुचक –मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.संध्या गायकवाड, मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

ड प्रभाग व ड मुख्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदाजामध्ये प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कामाच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.१३,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११६३० विषय क्रमांक – ५२

दिनांक – ०२/०६/२०१५

सुचक –मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.संध्या गायकवाड, मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१५-१६ य़ा आर्थिक वर्षामध्ये प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे तरतूद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.६०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११६३१ विषय क्रमांक – ५३

दिनांक – ०२/०६/२०१५

सुचक –मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.संध्या गायकवाड, मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

फ क्षेत्रीय कार्यालय मुख्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकामध्ये प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कामाच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

(वाढ/घट र.रु.४५,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११६३२ विषय क्रमांक – ५४

दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग – SRA-EWS प्रकल्प

सुचक –मा.सुनिता गवळी अनुमोदक – मा.विनायक गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वि/SRA-EWS/२३/२०१५ दि.१/६/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मराठी पत्रकार परिषद मुंबईच्या अंतर्गत पिंपरी चिंचवड पत्रकार संघाच्या वतीने ४० वे द्विवार्षिक अखिल भारतीय पत्रकारांचे अधिवेशन दि. ६ व ७ जून २०१५ रोजी कै.अंकुश लांडगे सभागृह, भोसरी येथे घेण्याचे नियोजन असून त्याकरिता देशातील विविध भागांतून सुमारे २५०० ते ३००० पत्रकार प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. सदर पत्रकार प्रतिनिधींना दोन दिवस राहणेकरिता म.न.पा.चे EWS प्रकल्प येथील ४०० सदनिका देणेस मा.आयुक्त यांनी संदर्भान्वये मान्यता दिलेली असून सदर ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात वीजपुरवठा करणेच्या सूचना दिलेल्या आहेत. सदर ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात विजपुरवठा मिळणेकरिता या विभागाकडील पत्र क्र. वि/SRA-EWS/१८/२०१५ दि.८/५/२०१५ अन्वये म.रा.वि.वि. कंपनीकडे कळविले असता त्यांनी पत्र क्र. दि. २५/५/२०१५ अन्वये सदर ठिकाणी एकूण दहा विजमीटर (प्रत्येक इमारतीस एक याप्रमाणे दहा

इमारतीस दहा याप्रमाणे) बसविणे आवश्यक असून त्याकरिता प्रत्येक विजमीटरकरिता र.रु.१०,४००/- याप्रमाणे एकूण दहा विजमीटरकरिता रक्कम रु.१,०४,०००/- इतकी रक्कम म.रा.वि.वि. कंपनीकडे अदा करणेस कळविले आहे. तरी सदरची र.रु.१,०४,०००/- म.रा.वि.वि. कंपनीकडे अदा केलेनंतरच त्यांचेकडून विजमीटर बसविणेत येणार आहेत.

तसेच सदरची रक्कम रु.१,०४,०००/- पुल व प्रकल्प विभाग (स्थापत्य) यांचेकडून खर्ची टाकून म.रा.वि.वि. कंपनीस मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र. वि/SRA-EWS/२२/२०१५ दि.१/६/२०१५ अन्वये अदा करणेत आलेली असून त्यानंतर प्रत्यक्ष विजवापर करणेत आलेप्रमाणे विजबिल अदा करणेस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११६३३ विषय क्रमांक – ५५
दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग – स्थापत्य बी.आर.टी.एस.
सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.कैलासभाऊ थोपटे
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/बीआरटीएस/४५२/२०१५ दि.२६/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

काळेवाडी देहू आळंदी या रस्त्यामधील पॅकेज ५ केएसबी चौक ते देहू आळंदी रस्ता या रस्त्याचे ४५/३०/२४ मीटर रुंदीने विकसीत करण्याचे काम महानगरपालिकेने कैंद्र शासनाच्या जे.एन.एन.यु.आर.एम. या योजनेअंतर्गत हाती घेतले आहे. या रस्त्याचे काम मे.ठाकुर इन्फ्राप्रोजेक्टस् प्रालि. यांना देण्यात आले आहे. सद्यस्थितीत उपलब्ध जागेतील सर्व कामे पुर्ण झाली असून उर्वरित काही भागामधील जागा ठेकेदारास डिसेंबर २०१४ मध्ये उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदरच्या जागेच्या उपलब्धतेसाठी भूसंपादनाची प्रक्रिया नोव्हेंबर २०१४ मध्ये पुर्ण झाली आहे. सदरच्या ठेकेदारास निविदेमध्ये हे काम १८ महिन्यांत पूर्ण करावयाचे होते. परंतु जागा उपलब्ध न झाल्याने ठेकेदारास भाववाढीसह मुदतवाढ महानगरपालिकेने मंजूर केली आहे. हे काम १८ महिन्यांच्या कालावधीत पूर्ण होण्याचे ग्राह्य धरुन निविदा रक्कमेच्या १५% पर्यंत भाववाढ होईल असे अपेक्षित होते. या कामाच्या निविदा स्विकृत करण्याचे आदेश मा.स्थायी समितीचा ठराव क्र. ८८७९, दि. ६/८/२००९ द्वारे मान्य झाला आहे.

सदरची कामे करताना अतिक्रमणे हटवणे, खाजगी वाटाघाटीने जागा मिळवून तसेच न्यायप्रविष्ट प्रकरणे इ. कारणाने प्रत्यक्ष जागा मिळून तेथे काम करण्यास विलंब झाला आहे. या कारणाने ठेकेदार त्यांना दिलेल्या विहित मुदतीत काम पूर्ण करु शकले नाहीत व त्यांना मुदतवाढ देणे आवश्यक असल्याने त्यांचे कामासाठी भाववाढीसह मुदतवाढ ही देण्यात आली आहे. सदर कामासाठी मुदतवाढ दिल्यामुळे भाववाढीची रक्कमही वाढली आहे व ती मा.स्थायी समितीच्या ठरावामध्ये नमूद केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त होते आहे. ठेकेदारास जागा उपलब्ध करुन न दिल्याने ते मुदतीत काम पूर्ण करु शकले नाहीत व मुदतीनंतर वाढीव मुदतीत काम केल्याने भाववाढ निविदा रकमेच्या १५% पेक्षा जास्त झाली आहे. या बीआरटीएस कामास उपलब्ध जागेमधील झालेली कामांची भाववाढ ठेकेदारास मा.स्थायी समितीच्या ठरावानुसार निविदा रकमेच्या १५% पर्यंत अदा करण्यात आली आहे. सदरच्या कामात आता उपलब्ध झालेल्या जागेत ठेकेदाराने काम सुरु केले आहे व सदरचे काम करत असातना यासाठी होणारी भाववाढ ही ठेकेदारास करारनाम्यानुसार अदा करणे बंधनकारक आहे. सदरचा वाढीव

कालावधीमध्ये म्हणजे ३१/५/२०१५ पर्यंत होणारी भावाढ निविदा रकमेच्या ६.०१% इतकी अपेक्षित आहे. त्यामुळे सदरच्या कामात उर्वरित देय होणारी भाववाढ (निविदा रकमेच्या ६.०१%) देण्यासाठी सदरचा प्रस्ताव सादर केला आहे.

सदर वाढीव कालावधीमधील करारनाम्यानुसार भाववाढ ही देय आहे. परंतु सदरची रक्कम मा.स्थायी समितीने पूर्वी मंजुर केलेल्या ठरावापेक्षा जास्त होत असल्याने त्यास मा.स्थायी समितीच्या मंजुरीसाठी फेरप्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

सबब मे.ठाकुर इन्फ्राप्रोजेक्टस् प्रा लि. यांना करारनाम्यानुसार देय असलेली भाववाढ अदा करणेच्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११६३४ विषय क्रमांक – ५६

दिनांक – ०२/०६/२०१५

सुचक –मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.संध्या गायकवाड, मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

वॉर्ड क्र.५० थेरगाव गावठाण येथील जलनिस्सारण विषयक कामे करणे व उर्वरित ठिकाणी जलनिस्सारण नलिका टाकणे या कामास यापुर्वी मा.स्थायी समिती ठराव क्र.१०४०४ दि.१३/१/२०१५ अन्वये निविदा रक्कम रुपये ४७,६१,६४३.०० चे कामास मे.बी.पी. खोडदे ऍण्ड कंपनी यांचेकडून ४०.१०% कमी दराने रक्कम रुपये २८,५२,२२४.२० पर्यंत काम करून घेण्यास मान्यता दिलेली आहे. तथापि सदर वॉर्डात ब-याच ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे आवश्यक असल्याने त्यासाठी येणा-या वाढीव खर्च रक्कम रुपये १९,०९,४१८.८० सह येणा-या सुधारीत खर्च रक्कम रुपये ४७,६१,६४३.०० (अक्षरी रक्कम रुपये सत्तेचाळीस लाख एकसष्ट हजार सहाशे त्रेचाळीस फक्त) सह सुधारीत मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११६३५ विषय क्रमांक – ५७

दिनांक – ०२/०६/२०१५

सुचक –मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.संध्या गायकवाड, मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

मनपाचे सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकातील Jnnurm अंतर्गत कामे करणे या उपलेखाशिर्षाखाली प्रस्तावात नमूद प्रमाणे वाढ घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.१,७५,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११६३६ विषय क्रमांक – ५८

दिनांक – ०२/०६/२०१५ विभाग – वैद्यकिय मुख्य कार्यालय

सुचक –मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सविता साळुंके

संदर्भ:- मा.संध्या गायकवाड, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

तालेरा रुग्णालयाचे विस्तारीकरणासाठी आवश्यक असलेला कर्मचारी वर्ग (स्टाफनर्स) एकत्रित मानधनावर हंगामी स्वरुपात प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे जाहिरातीद्वारे ६ महिने कालावधीसाठी भरणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११६३७ विषय क्रमांक – ५९

दिनांक – ०२/०६/२०१५

सुचक –मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भ:- मा.संध्या गायकवाड, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव...

ड प्रभाग व ड मुख्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदाजामध्ये कामाच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.३७,७५,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११६३८ विषय क्रमांक – ६०

दिनांक – ०२/०६/२०१५

सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भ:- मा.सविता साळुंके, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव...

सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात प्राधान्याने करावयाच्या ब-याच कामांना तरतूदी कमी असल्याने निविदा कार्यवाही करता येणे शक्य नाही. प्रस्तावासोबतचे तक्त्याप्रमाणे वाढ/घट प्रस्तावास मान्यता मिळाल्यास निविदा कार्यवाही करता येणे शक्य आहे. त्याप्रमाणे त्यास मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.८३,१९,६००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे)
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/१०/कावि/५९/२०१५
दिनांक - ०२/०६/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.